MHAM150001682026

M.J.Cases/58/2026

**Bebi Dhamrpal Patil Vs. Nil**

निशाणी ०१ खालील आदेश

(दिनांक - ०४/०५/२०२६ रोजी पारीत)

सदरचा अर्ज अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन अ◌ॅक्ट १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ चे वडील मयत धर्मपाल बारकुजी पाटील हे दिनांक ०७.१२.२०२५ रोजी मयत झाले आहे. मयत धर्मपाल बारकुजी पाटील यांची आई बरेच वर्षापुर्वी मरण पावलेली आहे. मयतांच्या मृत्युनंतर अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांनी सदरचा अर्ज कायदेशीर कामाकरीता वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने केलेला आहे. अर्जदारांव्यतिरिक्त मयतांचे इतर  कोणीही वारस नाही.

३. पुढे अर्जदारांनी त्यांच्या दाव्याच्या पृष्ठयर्थ अर्जदार क्र. १ यांची साक्ष निशाणी ११ प्रमाणे नोंदविली. तसेच मयत धर्मपाल बारकुजी पाटील यांचे मृत्युचा दाखला निशानी १२ प्रमाणे दाखल केला आहे. अर्जदार यांनी त्यांच्या आधार कार्डच्या साक्षांकीत प्रती नि.क्र. १३ ते १७ प्रमाणे दाखल केल्या आहेत. तसेच अर्जदारांनी वर्तमानपत्रामध्ये जाहीरनामा प्रकाशीत करून मयतांचे वारस असल्याबद्दलचा कोणाचा आक्षेप आल्यास तो नोंदविण्याबाबत सर्व लोकांना सुचित केले आहे, परंतु विहीत मुदतीत किंवा आजपर्यंत कुणीही त्यावर आक्षेप नोंदविलेला नाही. सदरच्या जाहीर नोटीसला नि. क्र. १८ देण्यात आले आहे. अर्जदारांव्यतिरिक्त मयतांचे वारस असल्याबाबत आजपर्यंत कोणीही आक्षेप घेतला नाही.

४. वरिल चर्चेचा सारासार विचार करता मी या निष्कर्षास आलो आहे की, अर्जदार हे मयत धर्मपाल बारकुजी पाटील यांचे कायदेशिर वारस आहे असे प्रमाणपत्र

आर.एम.जे.सी.क्र. ५८/२०२६
निशाणी १ खालील आदेश

अर्जदाराचे नावे मिळण्यास पात्र आहे. त्याकरीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

१. सदरचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हे मयत धर्मपाल बारकुजी पाटील यांचे कायदेशीर वारस आहे, असे वारस प्रमाणपत्र मयत धर्मपाल बारकुजी पाटील यांचे नावे अर्जात नमुद कारणाकरीता जारी करण्यात यावे.

३. अर्जदार यांनी नियमाप्रमाणे कोर्ट फी स्टॅंप द्यावा.

स्वा/-
**(एन. के. खराडे)**
प्र. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
मोर्शी.

ठिकाण : मोर्शी.
दिनांक : ०४/०५/२०२६